| | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | करयोग्यमूल्य निश्चिीतीकामी धोरण |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/६/कावि/४५८/०५, दिनांक : ०९/०८/२००५ |
| विषय | महानगरपालिका हद्दीत नव्याने येणा-या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील उद्योगाचे करयोग्य मुल्य निश्चितीकामी वाजवी भाडे निश्चिती बाबत |
| अंमलबजावणी कालावधी | सन २००५-२००६ ते सन २००९-२०१० पर्यंत |
| कोणाच्या माहितीसाठी | प्रशासन अधिकारी, सहाय्यक मंडलाधिकारी, मिळकतकर निरीक्षक, गटप्रमुख |
| संदर्भ | मा. महापालिका ठराव क्रमांक ५५०५, २४/०६/२००५ |

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.
करआकारणी व करसंकलन विभाग

परिपत्रक

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण ८ नियम ७(१) अन्वये मालमत्ता करांचे वार्षिक आकारणी करिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील इमारतींचे वाजवी वार्षिकभाडे आणि करयोग्यमूल्य ठरविता येते.

पिंपरी चिंचवड शहरात माहिती तंत्रज्ञान युनिट जास्तीत जास्त संख्येने यावेत या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने नवीन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण - २००३ कायम केले आहे. सदर धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करून मर्यादित कालावधीमध्ये फलनिष्पती होणेकरीता संबंधित विभागाने घेतलेल्या निर्णयाची शासन निर्णय प्रत शासनाचे सर्व विभागास पाठविलेली आहे. शासन निर्णय क्रमांक आयटीपी-२००३/सीआर-३३११/ आयएनडी-७ मंत्रालय, मुंबई - ३२. दिनांक १२/७/२००३ अन्वये माहिती तंत्रज्ञान धोरण प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत सविस्तर विवेचन केले असून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्याना महापालिकेने ज्या काही पायाभूत सेवा पुरविलेल्या आहेत आणि उन्नतीकरीता सहाय्य करावयाचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून अशा कंपन्यांचे मालकीचे जागेकरीता/मालमत्तेकरिता मालमत्ता कराचे दायित्व निश्चित करताना सहिष्णूता किंवा सहानभुतीचे धोरण अवलंबावे अशी महत्वाची सुचना आहे.

पिंपरी चिंचवड शहर हिंजवडी व पुणे शहरांच्या मध्ये वसले असून या दोन्ही ठिकाणी आय.टी. कंपन्यांचा विस्तार वाढत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहरात या उद्योगांना आकर्षित करणे आवश्यक आहे. शहरात माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्या आल्यास त्याचा शहराचे विकासास हातभार लागेल व रोजगारासह इतर अप्रत्यक्ष फायदा होईल. तसेच हा उद्योग प्रदूषणमुक्त व कमी पाणी लागणारा असल्याने पर्यावरणाची हानी होणार नाही. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील युनिट करीता सवलतीचे धोरण राबविणे आवश्यक वाटते. याकामी खालील प्रमाणे धोरण निश्चित करणेत येत आहे.

१. मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ५५०५, दिनांक २४/०६/२००५ यास अनुसरुन व शासन निर्णय क्रमांक आयटीपी-२००३/सीआर-३३११/ आयएनडी-७ मंत्रालय, मुंबई - ३२. दिनांक १२/७/२००३ मध्ये नमूद केलेल्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील जे उद्योग नव्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत येतील व नवीन स्वत:चे मालकीचे इमारतीत उद्योग सुरू करतील अशा कंपन्यांचे इमारत बांधकामावर अपेक्षित भाडे ठरविताना इतर बिगरनिवासी मिळकतीप्रमाणे प्रचलित दराने वार्षिक भाडे न ठरविता सवलतीच्या दराने नाममात्र प्रती चौ.फुट रूपये १/- या बिगरनिवासी दराने अपेक्षित वाजवी भाडे निश्चित करण्याचे धोरण अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत येत आहे.
२. सदरचे धोरण फक्त माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील नव्याने महापालिका हद्दीत येणा-या व स्वत:चे मालकी हक्काचे इमारतीत व्यवसाय करणा-या युनिट करीताच लागू राहील व हे धोरण चालू वर्षापासून ५ वर्षाकरीताच म्हणजे सन २००५-२००६ ते २००९-२०१० पर्यंत अंमलात राहिल.
३. मा.महापालिका सभेच्या मंजुरीस अधिन राहून चालू सरकारी आर्थिक वर्षाकरिता यापूर्वीच्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील मिळकतींना ज्याप्रमाणे १२% सामान्य कर आकारणेचे धोरण आहे ते देखील नवीन कंपन्यांनाही लागू राहील.

सही/-
**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत :
१. सहाय्यक मंडलाधिकारी,
---------------- विभागीय कार्यालय
२. प्रशासन अधिकारी
३. मुख्य लेखापरिक्षक
४. शहर अभियंता

सही/-
**करआकारणी व करसंकलन प्रमुख**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.